निवडणूक तात्काळ/ई-मेलद्वारे

नाशिक, औरंगाबाद व अमरावती या तीन विभागातील संबंधित जिल्ह्यांतील माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १९ ऑगस्ट २०१७

प्रति,
नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे
(जिल्हाधिकारी-नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर,
औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, जालना, लातूर, हिंगोली,
अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम व बुलडाणा- एकूण १८ जिल्हे).

विषय :- नाशिक, औरंगाबाद व अमरावती या तीन विभागातील संबंधित जिल्ह्यांतील माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम....

संदर्भ :- १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१/का-८, दिनांक ०१/०६/२०१७ रोजीचे प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यक्रमाबाबतचे आदेश.
२) आयोगाचा समक्रमांकाचा दि.०७/०७/२०१७ रोजीचा मतदार यादी कार्यक्रम.
३) आयोगाचे समक्रमांकाचे दि.०८/०८/२०१७ रोजीचे मतदार यादी कार्यक्रमाबाबतचे सुधारीत निर्देश.

महोदय / महोदया,

ज्याअर्थी, आयोगाच्या उक्त संदर्भ क्र.१ च्या कार्यक्रमानुसार प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमाची कार्यवाही पूर्ण झालेल्या नाशिक, औरंगाबाद व अमरावती या तीन विभागातील संबंधित जिल्ह्यांतील (परिशिष्ट-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आयोगाच्या संदर्भ क्र.२ च्या पत्राद्वारे मतदार यादी कार्यक्रम दि.०७ जुलै २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला होता.

आणि ज्याअर्थी, तांत्रिक कारणास्तव संदर्भ क्र.३ अन्वये माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींकरिताच मतदार यादी कार्यक्रम दि.०८ ऑगस्ट २०१७ रोजी निर्गमित करून त्यामध्ये पुढील कालावधीमध्ये म्हणजे माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींसाठी मतदार यादी कार्यक्रम आयोगाकडून अलाहिदा जाहीर करण्यात येईल असे नमूद करण्यात आले होते.

त्याअर्थी, आता सदर कालावधीसाठी उक्त तीन विभागातील संबंधित जिल्ह्यांकरिताच मदतार यादीचा सुधारीत कार्यक्रम सोबत परिशिष्ट-२ मध्ये दर्शविण्यात येत आहे. या कार्यक्रमासंबंधात पुढीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत:-

१. मंगळवार दि.२२/०८/२०१७ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या संबंधित ठिकाणी प्रसिध्द करून त्यावर सोमवार दि.२८/०८/२०१७ पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम करण्यात याव्यात व त्याची जाहीर प्रसिध्दी शुक्रवार दि.०१/०९/२०१७ पर्यंत संबंधित ठिकाणी करण्यात यावी.

२. **हा कार्यक्रम राबविताना हरकती व सूचना दाखल होण्याच्या कालावधीत हरकती प्राप्त झाल्याच्या दिवशीच आक्षेपांचे निरसन करण्यात यावे, जेणेकरून सदर कार्यक्रम विहित मुदतीत पार पाडता येईल.**

३. आयोगाच्या समक्रमांकाच्या याआधी दि.०७/०७/२०१७ रोजी निर्गमित केलेल्या मतदार यादी कार्यक्रमाबाबतच्या आदेशातील सर्व संबंधित निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व मतदार यादी कार्यक्रमाचा टप्पानिहाय अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

मा राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत: परिशिष्ट-१ व २

प्रत :- १) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी. *(कृ.मा.प.)*

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व).

**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.**

३) संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

४) सहायक आयुक्त कार्यासन-१२ यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

५) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

६) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

७) निवड नस्ती.

(परिशिष्ट-१)

*(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८, दि.१९/०८/२०१७ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)*

राज्य निवडणूक आयोगाने आदेशित केलेला नाशिक, औरंगाबाद व अमरावती या तीन विभागातील संबंधित जिल्ह्यांतील माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम राबविणाऱ्या
जिल्ह्यांची सूची.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | संबंधित जिल्ह्यांच्या अहवालानुसार माहे नोव्हेंबर- २०१७ ते फेब्रुवारी २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | नाशिक | १७३ |
| २ | | धुळे | १०८ |
| ३ | | जळगांव | २४१ |
| ४ | | नंदुरबार | ६४ |
| ५ | | अहमदनगर | २६३ |
| नाशिक विभाग एकूण | | | ८४९ |
| ६ | औरंगाबाद | औरंगाबाद | २१४ |
| ७ | | बीड | ८६५ |
| ८ | | नांदेड | १७५ |
| ९ | | परभणी | १२८ |
| १० | | उस्मानाबाद | १६६ |
| ११ | | जालना | २४१ |
| १२ | | लातूर | ३५६ |
| १३ | | हिंगोली | ४९ |
| औरंगाबाद विभाग एकूण | | | २,१९४ |
| १४ | अमरावती | अमरावती | २७६ |
| १५ | | अकोला | २७५ |
| १६ | | यवतमाळ | ९३ |
| १७ | | वाशीम | २८९ |
| १८ | | बुलडाणा | ३२२ |
| अमरावती विभाग एकूण | | | १,२५५ |
| एकूण | | | ४,२९८ |

(परिशिष्ट-२)

*(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८, दि.१९/०८/२०१७ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)*

# नाशिक, औरंगाबाद व अमरावती या तीन विभागातील संबंधित जिल्ह्यांतील माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.

## (मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक शनिवार दि.०१/०७/२०१७)

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार दि.२२/०८/२०१७ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | मंगळवार दि.२२/०८/२०१७ ते सोमवार दि.२८/०८/२०१७ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय मतदार यादीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे. | शुक्रवार दि. ०१/०९/२०१७ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र